


सोलापूर महानगरपालिका कामगार
कल्याण जनसंपर्क विभाग
ई – न्यूजलेटर





Volume III Issue 16 Date 21-06-2024


वटपौर्णिमेनिमित्त सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने माझी वसुंधरा अभियानांतर्गत आज महापालिका इंद्र भवन येथे सहाय्यक आयुक्त ज्योती भगत पाटील व मुख्य लेखा परीक्षक रूपाली कोळी यांच्या हस्ते महापालिकेतील महिला अधिकारी व कर्मचारी यांना वडाचे वृक्ष देऊन वटपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सहाय्यक आयुक्त ज्योती भगत-पाटील यांनी सर्व महिलांना दिलेल्या वृक्षाचे घराच्या परिसरात रोपण करून त्याचे जोपासना करावी असे आवाहन केले.वटपौर्णिमा हा सण महिला मोठ्या उत्साहाने साजरा करतात. ज्येष्ठ महिन्यात येणारी पौर्णिमा हा दिवस वटपौर्णिमा म्हणून साजरा केला जातो. आपल्या पतीला उत्तम आयुष्य आणि आरोग्य लाभण्यासाठी हे व्रत करण्यात येतं.वड हा वृक्ष दीर्घायुषी असल्याने वृक्षांचे संवर्धन आणि जतन व्हावे या हेतूने वृक्षाची पूजा करतात. याप्रसंगी सहाय्यक आयुक्त ज्योती भगत-पाटील यांनी सर्व महिलांना वटपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी मुख्य लेखापरीक्षक रूपाली कोळी यांनी उपस्थित महिला अधिकारी व कर्मचारी यांना वडाचे वृक्षाचे महत्व वृक्षाची जोपासना कशी करावी त्याचे आलेले फळ हे कसे पक्षांसाठी उपयोगी ठरतात याची माहिती दिली. या कार्यक्रमास संगणक विभागाचे प्रमुख स्नेहल चपळगावकर, यु सी डी विभागाचे उज्वला गणेश, वाहन अधीक्षक नागनाथ मेंडगुळे, श्री शेरखाने, पर्यावरण व्यवस्थापक स्वप्निल सोलनकर, जनसंपर्क अधिकारी श्रीगणेश बिराजदार, दिलीप भामरे, शहर समन्वयक दामिनी जवळकर आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी आरोग्य निरीक्षक अंजली काकडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

